# गर्भ शस्त्रक्रियासंबंधित समस्यांबाबत परिषद

**मुंबई** : गर्भ शस्त्रक्रियेचे वाढते प्रमाण ही चिंतेची बाब ठरत असून ५ हजारांपैकी अंदाजे ५ गर्भांना याची आवश्यकता भासते. स्पाइना बिफिडा, मानेचा आकार मोठा असलेले बाळ, मूत्रमार्गात अडथळे (छवळड) आणि काही ट्यूमर यांसारख्या गोष्टी गर्भाच्या विकासावर परिणाम करतात. त्यामुळे भविष्यातील हानी टाळण्यासाठी वेळीच उपचार मिळावेत, यासाठी लीलावती हॉस्पिटल, स्पायना बिफिडा फाऊंडेशन आणि पोलंडच्या द मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसियाच्या संयुक्त विद्यमाने गर्भाच्या शस्त्रक्रिया (फिटल सर्जरी) विभागाचे उद्घाटन केले आहे, ज्याचे उद्दिष्ट गर्भातील जन्मजात दोष आणि गर्भाच्या आरोग्याची स्थिती सुधारणे हे आहे. गर्भ शस्त्रक्रिया आणि मूत्रसंस्थेसंबंधित शस्त्रक्रियेच्या अडचणी सोडवण्यासाठी २२ ते २४ मार्च या दरम्यान तीन दिवसीय परिषद २०२४ (FSUI2024) आयोजित करण्यात आली आहे.

गर्भाच्या शस्त्रक्रियेमध्ये गर्भधारणेदरम्यान गर्भावर शस्त्रक्रिया केली जाते, ज्याचा उद्देश जन्मजात दोष असलेल्या मुलांना योग्य उपचार मिळावेत, जेणेकरून त्यांच्या जन्मानंतरच्या गुंतागुत टाळता येऊ शकतात. वेळीच उपचार न झाल्यास भविष्यात आरोग्यासंबंधी गुंतागुंत, अपंगत्व किंवा मृत्यू ओढावू शकतो. स्पायना बिफिडा आणि गर्भाच्या मूत्रमार्गातील अडथळे यांसारख्या परिस्थितीत गर्भाची शस्त्रक्रिया करून विकसनशील अवयवांना नुकसान होण्याचा धोका कमी करते, ज्यामुळे अर्भकांसाठी



भविष्यात चांगले आयुष्य मिळू शकते. त्यामुळे अशा गोष्टीत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हे चर्चासत्र फायद्याचे असणार आहे.

भारतात भ्रूण शस्त्रक्रियेच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नरिमन पॉईंटच्या ट्रायडंट हॉटेलमध्ये तीन दिवसीय भ्रूण शस्त्रक्रिया आणि मूत्रसंसर्ग शस्त्रक्रिया परिषद (ऋवक2024) आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत जगभरातील तज्ज्ञ, अभ्यासक आणि संशोधक भारतातील गर्भ शस्त्रक्रिया आणि त्याच्या विकासाच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी एकत्र येणार आहे. या परिषदेमध्ये भ्रूण शस्त्रक्रियेच्या क्षेत्रातील नवीन सर्जिकल तंत्रे आणि प्रगती याविषयी यावर चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये युरोप आणि यूएसएमधील गर्भ शल्यचिकित्सकांकडूनही मार्गदर्शन केले जाईल. सखोल चर्चा आणि चित्रफितींद्वारे सर्जरी तंत्र आणि गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यासारख्या विषयांवर चर्चा केली जाईल.

या एफएसयूआय परिषद २०२४ चे अध्यक्ष आणि लीलावती रुग्णालयातील बालरोग शल्यचिकित्सक डॉ. संतोष करमरकर, पोलंडमधील गर्भ शल्यचिकित्सक डॉ. एग्निएस्का पास्तुस्का आणि एफओजीएसआय(ऋढश्रक) चे अध्यक्ष डॉ. तांदूळवाडकर यांचा समावेश आहे. या परिषदेचे उद्घाटन प्रशांत मेहता (विश्वस्त- लिलावती कीर्तिलाल मेहता मेडिकल ट्रस्ट) यांच्या हस्ते होणार आहे.

जन्मतःच दोष असलेल्या बाळांच्या पालकांसाठी ही परिषद आशेचा किरण ठरणार आहे. भ्रूण शस्त्रक्रिया विभागाची स्थापना ही पालकांना त्यांच्या मुलाच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी सक्षम करेल, त्यांना जन्मापूर्वीच चांगली काळजी घेणे, आवश्यक ज्ञान आणि संसाधनांसह सुसज्ज करण्यासाठी याचा नक्कीच फायदा होईल, असे लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, वांद्रे येथील चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. नीरज उत्तमानी यांनी सांगितले.